॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## EXAMINATION DEPARTMENT

Phone: (02462) 215294
Fax : (02462) 215520

Website: www.srtmun.ac.in E-mail: directorboee@srtmun.ac.in

संदर्भ : परीक्षा/विज्ञान/२०२५–२६/६७७७ दिनांक : १३/०९/२०२५

(सुधारित)

## Question Paper Pattern for UG & PG (NEP) Courses under the Faculty of Sci. & Tech. w.e.f. 2025-26

प्रति,

१) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित **विज्ञान पदवी व पदव्युत्तर** महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. संचालक, सर्व विज्ञान अभ्यासक्रम संकुले, प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड; उप–परिसर लातूर; उप–परिसर परभणी.
३) मा. प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.

विषय : NEP-2020 पॅटर्ननुसार शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून २, ३ व ४ क्रेडीटसाठीच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपाबाबत.

संदर्भ : १) मा. अधिष्ठाता व सर्व मा. अभ्यासमंडळ अध्यक्ष, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, यांच्या दि.०४/०९/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय.
२) परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र.परीक्षा/२०२५–२६/६०८१, दि.२८/०८/२०२५.
३) शैक्षणिक (अभ्यासमंडळ–१) विभागाचे परिपत्रक क्र.शै–१/एनइपी/एईसीद्वितीयवर्ष/२०२५–२६/१४८, दि.१०/०७/२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून **प्रथम व द्वितीय वर्ष पदवी आणि प्रथम वर्ष पदव्युत्तर** अभ्यासक्रमांसाठी ६०–४० असा पॅटर्न टप्प्या–टप्प्याने लागू करण्यात आलेला असल्यामुळे २, ३ व ४ क्रेडीटसाठी खालीलप्रमाणे प्रश्नपत्रिकेचे स्वरूप निश्चित करण्यात आलेले आहे.

**(अ) २ क्रेडीटसाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप – वेळ ०२:०० तास – कमाल गुण : ३०**

i) पहिला प्रश्न १० गुणांचा असून, तो अनिवार्य आहे. यामध्ये एकूण ४ उप–प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नासाठी २.५ गुण आहेत. (संपूर्ण अभ्यासक्रमांवर आधारित प्रश्न असणे आवश्यक आहे.)
ii) प्रश्न क्रमांक २ ते ५ मधील कोणतेही २ प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नासाठी १० गुण आहेत.

**(ब) ३ क्रेडीटसाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप – वेळ ०२:०० तास – कमाल गुण : ४५**

i) पहिला प्रश्न १५ गुणांचा असून, तो अनिवार्य आहे. यामध्ये एकूण ५ उप–प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नासाठी ३ गुण आहेत. (संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न असणे आवश्यक आहे.)
ii) प्रश्न क्रमांक २ ते ५ मधील कोणतेही २ प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नासाठी १५ गुण आहेत.

**(क) ४ क्रेडीटसाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप – वेळ ०२:३० तास – कमाल गुण : ६०**

i) पहिला प्रश्न १५ गुणांचा असून, तो अनिवार्य आहे. यामध्ये एकूण ५ उप–प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नासाठी ३ गुण आहेत. (संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न असणे आवश्यक आहे.)
ii) प्रश्न क्रमांक २ ते ६ मधील कोणतेही ३ प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नासाठी १५ गुण आहेत.
iii) प्रश्न क्रमांक ६ हा १५ गुणांचा असून, त्यात प्रत्येकी ५ गुणांचे ४ उप–प्रश्न (प्रत्येकी एका मॉड्यूल/युनीटवर एक याप्रमाणे) असतील व त्यापैकी कोणतेही ३ उप–प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

**शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून NEP-2020 अंतर्गत प्रथम व द्वितीय वर्ष पदवी आणि प्रथम वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी वरीलप्रमाणे प्रश्नपत्रिकेचे स्वरूप लागू करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. NEP-2020 अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष पदवी व प्रथम वर्ष पदव्युत्तर वर्गातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या परीक्षा ६०–४० पॅटर्नप्रमाणे घेण्यात येतील व प्राप्त गुणांचे रूपांतर ८०–२० मध्ये करून त्यांचा निकाल जाहीर करण्यात येईल.**

**तरी सर्व प्राश्निकांनी प्रश्नसंच तयार करताना वरीलप्रमाणे नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच मा. प्राचार्य/मा. संचालक, यांनी ही बाब सर्व विद्यार्थी व संबंधित शिक्षक यांच्या निदर्शनास आणून देऊन अंमलबजावणीची कार्यवाही करावी.**

टीप : संदर्भीय दोन्ही परिपत्रकांमधील प्रश्नपत्रिकेचे स्वरूप विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेकरिता लागू राहणार नाहीत.

प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ. २. मा. प्र–कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ. ४. मा. अध्यक्ष, सर्व अभ्यासमंडळे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
५. अभ्यासमंडळ विभाग, प्रस्तुत विद्यापीठ. ६. पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ. ७. सीनिअर प्रोग्रामर, संगणक कक्ष, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.